# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-20.06.2026** **वार- शनिवार**

---

**विकास कॉरीडॉर ३१कोल्हापूर**

दक्षिणकाशी म्हणून ओळखलं जाणारं करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिर आणि परिसर, शासन 15 शे कोटी रुपयांचा निधी खर्चून, विकास कॉरीडॉर म्हणून विकसित करत आहे, ही बाब सर्व भाविकांसाठी अत्यंत अभिमानास्पद असल्याची भावना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज कोल्हापूर इथं व्यक्त केली.

पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित कृतज्ञता सोहळा सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, सहपालकमंत्री माधुरी मिसाळ आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

गृहमंत्री शाह म्हणाले की, सातव्या शतकातील या प्राचीन मंदिराच्या परिसरातील सुमारे ४१ लहान-मोठ्या मंदिरांचं संवर्धन करून हा परिसर पुढील सहा महिन्याच्या आत विकसित करण्यात येणार आहे. या ठिकाणी अन्नछत्र सुरू करण्याबाबत आपण सकारात्मक असल्याचंही त्यांनी सांगितलं. आपल्या वारशाचं, संस्कृतीचं जतन, संवर्धन करणं आणि त्याला चालना देणारं हे शासन असल्याचे स्पष्ट केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कारकीर्दीत आर्थिक, संरक्षण, सुरक्षितता या सर्वच क्षेत्रात झालेल्या प्रगतीची मांडणी करताना ते म्हणाले की देशातील एक-एक घुसखोर शोधून काढल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

**योग**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील विद्यापीठ हायस्कूलमध्ये ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात आज साजरा करण्यात आला. राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालयाद्वारे पुरस्कृत पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सह-सुविधा केंद्र, वनस्पतीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेचे विद्यापीठ हायस्कूल यांच्याद्वारे या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावर्षी ‘निरोगी वृद्धत्वासाठी योग’ या जागतिक संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाच्या प्रारंभी, मान्यवरांचं औषधी रोपं देऊन स्वागत करण्यात आलं. पुण्यातील योगी ओमश्री आचार्य शिव योगचे मुख्य योग मार्गदर्शक, शिव आचार्य यांनी, विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना, विविध योगासनं, प्राणायाम आणि ध्यानसाधनेचं प्रात्यक्षिक करून योगाचे आरोग्यदायी लाभ समजावून सांगितले.

प्रमुख संशोधक प्राध्यापक डॉक्टर दिगंबर मोकाट यांनी ‘निरोगी वृद्धत्वासाठी योग आणि औषधी वनस्पतींचं महत्त्व’ या विषयावर मार्गदर्शन करत योग आणि वनस्पतीशास्त्र यांचा आरोग्य संवर्धनासाठी असलेला परस्परसंबंध स्पष्ट केला.

**अग्निसुरक्षा**

राष्ट्रीय बांधकाम संहितेमधील अग्नि आणि जीवित सुरक्षा नियमांतर्गत राज्यातील सर्व बांधकाम प्रकल्प, डाटा सेंटर, ईव्ही पार्किंग, मेट्रो स्थानकं, वखार, तंत्रज्ञान उद्यानं यांसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र अग्निसुरक्षितता निकष लागू होणार असून, अग्निसुरक्षितता व्यवस्थेत मोठा बदल घडणार आहे," अशी माहिती महाराष्ट्र अग्निशमन सेवेचे संचालक आणि  महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अग्निशमन अधिकारी संतोष वारीक यांनी दिली. भारतीय अग्नि आणि सुरक्षितता संघटनेच्या पुणे शाखेतर्फे आयोजित एका तांत्रिक परिषदेत वारीक बोलत होते. महाराष्ट्र अग्निशमन सेवा, पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या सहकार्यानं वाकड इथं  ही परिषद पार पडली.

**कौशिक आश्रम**

‘कौशिक आश्रम’ संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांची सेवा करणारं कर्तव्यपूर्तीचं केंद्र आहे, अशी भावना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भय्याजी जोशी यांनी आज पुण्यात व्यक्त केली. पुण्यातील मित्रमंडळ सोसायटीमध्ये असलेल्या ‘कौशिक आश्रम’ या वास्तूच्या पुनर्निर्माणानिमित्त आयोजित ‘कृतज्ञता सत्कार कार्यक्रमा’त  जोशी बोलत होते. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्राध्यापक नानासाहेब जाधव आणि संस्थेचे विश्वस्त दिवाकर पांडे यावेळी प्रामुख्यानं उपस्थित होते.

‘कौशिक आश्रम’ पुनर्निर्माणाच्या कार्यात मोलाचं योगदान दिलेल्या हितचिंतकांचा प्रातिनिधिक सत्कार, मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. आत्मीयता, समाधान, आणि आनंदाचं वातावरण ज्या वयात अनुभवायला मिळालं पाहिजे, असे ज्येष्ठ कार्यकर्ते ‘कौशिक आश्रम’ इथं राहणार आहेत असं जोशी यांनी सांगितलं.

**बालगंधर्व**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचं प्रतीक असलेल्या बालगंधर्व रंगमंदिराचा ५८ वा वर्धापन दिन महोत्सव चोवीस जूनपासून तीन दिवस उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. बालगंधर्व परिवार ट्रस्टच्या वतीनं आयोजित करण्यात येणारा हा महोत्सव गेल्या १९ वर्षांपासून आयोजित केला जातो अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांनी आज  पत्रकार परिषदेत दिली. ऑर्केस्ट्रा क्षेत्रात ६५ वर्षे उल्लेखनीय योगदान देणारे ‘मेलडी मेकर्स’चे निर्माते अशोककुमार सराफ यांना ‘जीवनगौरव पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. तसंच  पद्मश्री पुरस्कारप्राप्त रघुवीर खेडकर यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**